पशुसंगोपन

# अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीत पशुधनाची घ्यावयाची काळजी




**डॉ. स्मिता कोल्हे**
(मो.नं. ९९७०४२५३८९)
**डॉ. राहुल कोल्हे**
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा






अतिवृष्टीमुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. जनावरांना योग्य प्रमाणात चारा व पाणी न मिळाल्याने तसेच दूषित पाणी प्यायल्याने घटसर्प, फऱ्या यासारखे रोग होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे वेळीच पशुधनास मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक लसीकरण करणे गरजेचे असते.

अतिवृष्टीमुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. जनावरांना योग्य प्रमाणात चारा व पाणी न मिळाल्याने तसेच दूषित पाणी प्यायल्याने घटसर्प, फऱ्या यासारखे रोग होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे वेळीच पशुधनास मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक लसीकरण करणे गरजेचे असते.

अतिवृष्टीच्या काळात पशुधनास घटसर्पाची लागण होण्याची शक्यता असते. यामध्ये ताप, गळ्याखाली सूज येणे. श्वासोच्छ्वासाला त्रास, नाकातून पाणी व पातळ स्राव वाहणे, शेळ्या- मेंढ्यांमध्ये खोकला/ अतिसार उद्‌भवणे इत्यादी लक्षणे आढळतात. अशा वेळी ताबडतोब उपचार न केल्यास फुफ्फुसाचा दाह होऊन मोठी जनावरे व शेळ्या- मेंढ्यांमध्ये मरतुक होण्याची शक्यता असते.

त्याचप्रमाणे २ ते ३ वर्षांच्या आतील जनावरांमध्ये फऱ्या रोगाची लागण होण्याची शक्यता असते. हा जिवाणूजन्य रोग असून जनावरांच्या पुढील फऱ्यास व मागील पायाच्या मांडीच्या स्नायूंना सूज येऊन जनावरे लंगडतात. जनावरांना ताप असतो. तसेच सूज आलेल्या ठिकाणी दाबले असता करकर असा आवाज येतो. वेळीच उपचार न झाल्यास २ ते ३ दिवसात जनावर दगावते.

**घ्यावयाची काळजी**

१. अतिवृष्टीमुळे पूर येऊन बऱ्याच वेळा गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या तसेच इतर पाळीव प्राण्यांची मरतुक होते. मरतुक मोठ्या प्रमाणावर झालेली असल्यास मृत प्राण्यांचे शव कुजून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरते व यातून काही रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. अशावेळी मृत प्राण्यांच्या शवांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे गरजेचे असते. शक्यतो मृत जनावरे गावाच्या बाहेर लोकवस्तीपासून दूर जाळून टाकावीत अथवा खड्ड्यामध्ये योग्य त्या प्रमाणात चुना व खडेमीठ टाकून पुरून टाकावीत. कोणत्याही परिस्थितीत मृत जनावरे उघड्यावर फेकू नयेत.

२. अतिवृष्टी/ पुरामुळे पाणी गढूळ व दूषित होते. असे पाणी जनावरांनी प्यायल्यास हगवणीसारखे आजार संभवतात. अशा वेळी शक्यतो स्वच्छ पाणी पाजावे व आवश्यकतेनुसार योग्य ते उपचार करावेत.

३. ओलसर झालेल्या धान्यात बुरशी व बुरशीजन्य विषारी घटकांची वाढ होते. असे खाद्य तसेच पावसाच्या पाण्यामुळे सडलेले धान्य, पशुखाद्य व इतर खाद्यपदार्थ खाल्ल्यास पोटफुगी, पातळ शौच, विषबाधा यासारखे आजार जनावरांना होतात. असे खाद्य जनावरांना खाऊ घालू नये.

४. पावसामुळे सर्व ठिकाणी हिरवे गवत मुबलक प्रमाणात वाढल्याने जनावरे ते अधाशीपणे खातात. त्यामुळे देखील जनावरांना हगवण होऊ शकते. शेळ्या- मेंढ्यांमध्ये आंत्रविषारसारखे रोग उद्‌भवू शकतात. अशा वेळी आंत्रविषार प्रतिबंधक लसीकरण करून घेणे फायद्याचे ठरते.

५. पूरस्थिती, अतिवृष्टी वातावरणातील बदल, खाद्यातील बदल या सर्व बाबींमुळे जनावरांमध्ये एक प्रकारचा ताण निर्माण होतो. त्यामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व ते किरकोळ आजारास लगेच बळी पडतात.

६. अतिवृष्टी अथवा पुरामध्ये जनावरांच्या गोठ्यात बऱ्याच वेळी भिंती कोसळणे, छप्पर पडणे इत्यादीसारखे अपघात घडू शकतात व यामध्ये जनावरे जखमी होतात. अस्थिभंग, खोलवर जखमा यासारख्या व्याधी त्यांना होऊ शकतात. याबाबत तत्काळ उपाययोजना करण्यात यावी.

७. पावसाळ्यात बऱ्याच ठिकाणी विजेच्या तारा तुटतात व आजुबाजूच्या पाण्यात पडतात. मोकळी सोडलेली जनावरे चरत असताना त्या भागामध्ये गेल्यास विजेचा धक्का बसून त्यांना मृत्यू येऊ शकतो. अशावेळी जनावरे मोकळी सोडू नयेत. त्यांना गोठ्यातच चारा व पाणी देण्यात यावे. जनावरे विजेच्या खांबांना अथवा त्यांच्या जवळपास बांधू नयेत.

८. पावसामुळे गोठ्यात सारखा ओलसरपणा, चिखल राहतो. त्यामुळे गोठ्यात गोमाशी, डास, गोचिड, पिसवा यांचा उपद्रव जनावरांना होतो. त्यांच्याद्वारे एकपेशीय जंतूंमुळे होणाऱ्या रोगाचा प्रसार होऊ शकतो. या ठिकाणी जंतुनाशके व कीटकनाशके फवारण्यात यावीत. त्याचप्रमाणे अशा गोठ्यातून कोरड्या चुन्याची पावडर व निर्जंतुकीकरणासाठी फिनाईल इत्यादींचा वापर करण्यात यावा.

९. पशुधनावर या परिस्थितीत ताण असल्याने त्यांना जीवनसत्त्वे, क्षार मिश्रण व ताणनाशक औषधे देण्यात यावीत.

१०. अतिपावसामुळे कोंबड्या भिजल्यामुळे त्यांना श्वसनाचे व पचनसंस्थेचे आजार होऊ शकतात. रक्ती हगवण (कॉक्सिडीओसीस) यासारखे आजार होऊन बऱ्याच प्रमाणात मरतुक होऊ शकते. योग्य औषधोपचार केल्यास मरतुक थांबविता येणे शक्य आहे.

११. अतिवृष्टीमुळे ओढ्यास, नदी-नाल्यास पूर येण्याची शक्यता असते व सखल भागात पाणी साचण्याची शक्यता असल्याने अशा ठिकाणी जनावरे बांधू नयेत. ■